अधिस्वीकृती पत्रिका मिळण्यासाठी प्राप्त झालेले अर्ज,
नुतनीकरण व अपील अर्ज यावरील कार्यवाहीबाबत.

महाराष्ट्र शासन
सामान्य प्रशासन विभाग
शासन निर्णय क्रमांक: - मावज-२०१९/प्र.क्र.७६/३४
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
दिनांक : - १९ मार्च, २०१९

वाचा :- १) शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्र.अधिस्वी-२०१५/प्र.क्र.२१९/३४, दिनांक १३ ऑगस्ट,२०१५
२) संचालक, माहिती व जनसंपर्क यांचे क्र.अधि.स/वृत्त-प्र/२०१९/का-२/७८९, दि. २ मार्च, २००९ चे पत्र.

**प्रस्तावना :**

राज्य व विभागीय अधिस्वीकृती समित्या संदर्भाधीन क्र.१ येथील शासन निर्णयान्वये स्थापन करण्यात आल्या होत्या. सदर समित्यांची मुदत दिनांक १२ नोव्हेंबर, २०१८ रोजी संपली आहे. त्यामुळे त्यापुढील कालावधीसाठी अधिस्वीकृती पत्रिका मिळण्यासाठी प्राप्त झालेले अर्ज, नुतनीकरण व अपील अर्ज यावरील कार्यवाही करण्यासाठी कार्यपध्दती विहित करण्याचे विचाराधीन होते. त्यावर पुढील प्रमाणे कार्यपध्दती विहीत करण्याचा निर्णय घेण्यात आला.

**शासन निर्णय :-**

राज्य व विभागीय स्तरावरील अधिस्वीकृती समित्यांची मुदत दिनांक १२ नोव्हेंबर, २०१८ रोजी संपल्यानंतर नवीन अधिस्वीकृती पत्रिका मिळण्यासाठी/नूतनीकरणासाठी प्राप्त झालेले अर्ज/अपील अर्ज याबाबत खालील प्रमाणे कार्यवाही करण्यात यावी.

१) अधिस्वीकृती पत्रिका मिळण्यासाठी प्राप्त झालेले नवीन अर्ज व तात्पुरती अधिस्वीकृती पत्रिका मिळण्यासाठी दिलेले अर्ज, ज्या पध्दतीने विभागीय आणि राज्य अधिस्वीकृती समित्यांच्या बैठकीत तपासले जात होते. त्याच पध्दतीने सदर अर्ज विभागीय उपसंचालक यांच्या अध्यक्षतेखालील विभागीय अधिका-यांच्या बैठकीत (संबंधित विभागातील जिल्हा माहिती अधिकारी व विभागीय संचालक/उपसंचालक) व संचालक (वृत्त) यांच्या अध्यक्षतेखालील राज्यस्तरीय अधिकाऱ्यांच्या बैठकीत (विभागीय संचालक/उपसंचालक व मुख्यालय {(माहिती व जनसंपर्क महासंचालनालय } येथील अधिकारी) तपासण्यात येऊन त्यावर योग्य ते निर्णय घेण्यात येतील.

२) प्राप्त झालेल्या अपील अर्जावरील सुनावणीसाठी, महासंचालक (माहिती व जनसंपर्क) विभागवार बैठका घेऊन अंतिम निर्णय घेतील.

३) पुढील अधिस्वीकृती समिती अस्तित्वात येईपर्यत, नवीन अर्जावर व अपील प्रकरणी अंतिम निर्णय घेण्याचे सर्व अधिकार महासंचालक (माहिती व जनसंपर्क ) यांना असतील

वरील आदेश पुढील राज्य व विभागीय अधिस्वीकृती समित्या स्थापन होईपर्यतच्या कालावधीसाठी लागू राहतील. तसेच दि. १२ नोव्हेंबर,२०१८ नंतर आतापर्यंतच्या कालावधीत वरील कार्यपध्दतीनुसार माहिती व जनसंपर्क महासंचालनालयाने केलेल्या कार्यवाहीस शासनाची कार्योत्तर मान्यता देण्यात येत आहे.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक २०१९०३१९११२७४३५९०७ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

**महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावांने.**

Ramkisan Narayanrao Musale

Digitally signed by Ramkisan Narayanrao Musale
DN: c=IN, o=Government of Maharashtra, ou=General Administration Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=e28f6332f6edfebdfb055bf154f99ec0b0d9e613209e20e7a215f026da6875ae, cn=Ramkisan Narayanrao Musale
Date: 2019.03.19 11:30:53 +05'30'

**( रा.ना.मुसळे )**
**अवर सचिव, महाराष्ट्र शासन**

**प्रत,**

१) मा. मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव,
२) मा.राज्यमंत्री (माहिती व जनसंपर्क) यांचे खाजगी सचिव
३) मा.सचिव, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मंत्रालय मुंबई.
४) महासंचालक, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मंत्रालय मुंबई.
५) उप सचिव, सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय,मुंबई.
६) संचालक (माहिती) (वृत्त व जनसंपर्क), माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मंत्रालय,मुंबई.
७) संचालक (माहिती) (प्रशासन), माहिती व जनसंपर्क महासंचालनालय,मंत्रालय, मुंबई.
८) उपसंचालक (वृत्त), माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मंत्रालय मुंबई.
९) सर्व विभागीय उपसंचालक, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मंत्रालय मुंबई.
१०) सर्व जिल्हा माहिती अधिकारी, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय
११) लेखा अधिकारी, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय,मुंबई.
१२) सर्व संबंधित संस्थापक व समिती सदस्य
१३) निवड नस्ती.